# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ११५/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०२/०३/२०१८

**१) जुन्या भांडणावरुन विळयासारख्या वस्तुने मारुन जखमी केल्याने गुन्हा नोंद . :-**

दिंनाक २८/०२/२०१८ चे १६.०० वाजता. दरम्यान यातील फिर्यादी व आरोपी एकमेकांचे घरा शेजारी राहत असुन एकाच जातीचे आहेत यातील फिर्यादी हा आपले मित्राला घरी सोडुन परत येत असतांना आरोपीने जुने भांडणा वरुन फिर्यादीची मोटार सायकल थांबवुन विळयासारख्या वस्तुने दोन्ही डोळयाजवळ, डोक्यावर व पाठीवर वार करुन दुखापत केल्याने फिर्यादी विशाल वसंत चौधरी वय २४ वर्ष, रा. हनुमान मंदीर चौक गोबरवाही यांचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन गोबरवाही येथे कलम ३२४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. मेश्राम पोलीस स्टेशन गोबरवाही हे करीत आहेत. .

**२) बस चालकाचे निष्काळजीपणामुळे एक मुलगी जखमी . :-**

दिंनाक ०१/०३/२०१८ चे १३.२८ वाजता. दरम्यान यातील फिर्यादीची मुलगी नामे कु. मोनीका वासुदेव लांजेवार वय १८ वर्ष ही बसस्थानक वरुन बस क्र. एम. एच. ०७/ सी ७५७६ मध्ये आय.टी.आय. बस स्थानक भंडारा वरून बसुन वरठी ला जात असतांनी यातील आरोपी बस चालकाने त्याचे ताब्यातील बस ही निष्काळजीपने , लापरवाहीने चालवुन व बसचे वाहकाने योग्य ती खबरदारी न घेतल्याने फिर्यादीची मुलगी कु. मोनीका ही बसचे समोरील दरवाज्यातुन खाली जमीनीवर पडुन तिचे दोन्ही हाताला व डोक्याला मार लागुन जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने असे फिर्यादी वासुदेव नारायण लांजेवार वय ५२ वर्ष, रा. पाचगाव यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन वरठी येथे कलम २७९,३३७ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. भोंदे पोलीस स्टेशन वरठी हे करीत आहेत.

**३) अस्तीत्व लपवुन दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्येशाने मिळुन आल्याने गुन्हा नोंद. :-**

दिंनाक ०१/०३/२०१८ चे २१.०० वाजता. दरम्यान यातील आरोपी हा अंधाराचा फायदा घेवुन स्वत:चे अस्तीत्व लपवुन कोणतारी दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्येशाने मिळुन आल्याने, सरतर्फे फिर्यादी पोना. फुलबांधे यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन वरठी येथे कलम १२२ मपोका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. फुलबांधे पोलीस स्टेशन वरठी हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**४) दारू पिवुन दारूच्या नशेत वाहन चालवितांनी मिळुन आल्याने गुन्हा नोंद. :-**

दिनांक ०१/०३/२०१८ चे २०.०० वाजता. दरम्यान यातील आरोपीने त्याचे ताब्यातील मोटार सायकल ही दारु पिवुन दारूचे नशेत गडकुंभली रोड येथे चालवितांनी मिळुन आल्याने, त्याचे वैद्यकीय तपासनी केली असता दारू पिला असल्या बाबत अहवाल प्राप्त झाल्याने, सरतर्फे फिर्यादी पोना. रामटेके यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम १८५(१) मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करून पुढील तपास पोना. रामटेके पोलीस स्टेशन साकोली हे करीत आहेत.

**५) उपचारा दरम्यान इसमाचा मृत्यु. :-**

दिंनाक ०१/०३/२०१८ चे १३.५० वाजता दरम्यान यातील मृतक भिमराव रामनाथ मोटघरे वय ६५ वर्ष, रा. पुयार याची प्रकृती खराब झाल्याने उपचारा करीता सामान्य रुग्नालय भंडारा येथे भरती केले असता, उपचारा दरम्यान मरण पावला. डॉक्टरी मेमो वरुन पोस्टे. भंडारा येथे मर्ग क्र. ००/१८ कलम १७४ जाफौ.चे कागदपत्रा वरून सरतर्फे फिर्यादी पोहवा. ढोरे यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखांदुर कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. खंडाते पोलीस स्टेशन लाखांदुर करीत आहेत.

६) गळफास लावुन महिलेचा मृत्यु. :–

दिंनाक ०१/०३/२०१८ चे १६.३० ते १७.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी पुरूषोत्तम लहाणु आत्राम वय ३५ वर्ष रा. सिरसाळा हा गाईचा चारा आनण्याकरीता बाहेर गावी गेला असता, मृतक सौ. नंदा पुरूषोत्तम वय ३१ वर्ष रा. सिरसाळा ही मागिल ३ महीण्यापासुन बिमार असुन मृतकने छातीच्या व डोक्याचे त्रासाला कंटाळुन घराचे मागे असलेल्या जुन्या घरी घराचे फाटयाला नॉयलान दोरीने स्वत: गळफास लावुन आत्महत्या केल्याने, फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. चाबुकस्वार पोलीस स्टेशन पवनी करीत आहेत.

७) अवैध दारु /जुगार अड्डयांवर धाडी . :–

दिनांक ०१/०३/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन भंडारा, कारधा, तुमसर, सिहोरा, गोबरवाही, साकोली, पालांदुर,लाखनी अडयाळ, व लाखांदुर येथे अवैध दारु/ जुगार अड्डयांवर धाडी घालुन एकुण २१ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन २१२ लिटर हातभट्टी दारू+ ८६० किलो सडवा+ साहित्य+ २ सायकल किंमती ४०,४५०/–रु. व ३१ लिटर १७० देशी/ विदेशी किंमती ९,६५७/–रु. तसेच जुगारातुन किंमती १६,४७०/–रु. असा एकुण किमती ६६,५७७/–रु. माल जप्त करण्यात आला.

८) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–

दिनांक ०१/०३/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण ७८ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवासी किंमती ०२ तीन सिटर वाहनाकरीता ०८ ईतर वाहनांवरती – ६८ केसेस करण्यात आले आहे.

02.3

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९८७३८५४०५

पोलीस अधीक्षक कार्यालय भंडारा (म.रा.)

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.